जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.१६/०९/२०१९**
**दि.१५/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ३०७/१९,भादविक ३०७,५०४,५०६,४५२,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१),१३५ |
| **फिर्यादी** | सौ.पुनम आकाश शिंदे,वय-२८ वर्षे,रा.भिमनगर,शिलाविहार कॉलनी,कोथरुड पुणे |
| **आरोपी** | श्रीनाथ ऊर्फ बाळा वाघमारे,वय-२०,रा.भिमनगर शिलाविहार कॉलनी,कोथरुड,पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०९/२०१९ रोजी रात्रौ १२/३० वा.चे सुमारास फिर्यादी यांचे राहते घरासमोर भिमनगर,शिलाविहार कॉलनी,कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती आकाश शिंदे,वय-३३ वर्षे हे एकटे त्यांचे राहते घरात असताना कोणीतरी दरवाजा वाजवल्याने आकाश यांनी दरवाजा उघडला असता,त्यांचे वस्तीतील यातील नमुद इसम श्रीनाथ ऊर्फ बाळा वाघमारे व त्यांचे साथीदाराने जबरदस्तीने फिर्यादी यांचे घरात घुसुन,आकाश याचेसोबत दहीहांडीच्या कार्यक्रमात श्रीनाथ वाघमारे याचेसोबत झालेल्या भाडणाच्या कारणावरुन,श्रीनाथ याने त्याच्या हातातील कोणत्यातरी धारदार हत्याराने आकाश यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांचे पोटावर,डाव्या मांडीवर व डाव्या हाताच्या बोटावर वार केले. तसेच त्याचे साथीदाराने घरातील पातेले व कळशी आकाश याचे डोक्यात मारुन त्यांना शिवीगाळ करून,धमकी देवुन,लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.ए.मुंढे ९४०३७३८५८९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ६०८/१९,भादविक ४६५,४६७,४६८,४७१,१०९,नोंदणी अधि.कलम ८२,३४, महा.रीजनल अँड टाऊनप्लानिंग ॲक्ट कलम ५२,महा.मेडिकल प्रॅक्टीशनल ॲक्ट १९६१ कलम ३३,३३ए |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-६९ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | एकुण १३ इसम व दोन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०७/२०१८ रोजी १७/०० वा.ते २१.३० वा. आधार मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल स.नं. ५६/१२,न-हेगाव,ता.हवेली,जि.पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे नातेवाईक यांना ह्रदयविकाराचा झटका आल्याने त्यांना आधार मल्टी स्पेशालीटी हॉस्पीटल स.नं.५६/१२,न-हेगाव,पुणे येथे दि.२१/०७/२०१८ रोजी १७/०० वा.ते २१/३० वा.चे दरम्यान उपचारकामी ॲडमिट केले होते. त्यावेळी तेथे हजर असलेले डॉक्टर यांनी महा.मेडिकल प्रॅक्टीशनल ॲक्ट १९६१ प्रमाणे नोंदणी केलेले नसतानाही व स्वतः कार्डीओलॉजीस्ट नसताना,ते एक आयुर्वेदीक डॉक्टर आहे हे माहित असताना,त्यांनी सदर पेशंटवर उपचार सुरु ठेवले. पेशंटची तब्येत खराब होत असताना,त्यांनी पेशंटचे ईसीजी रीपोर्ट खाजगी नामांकीत हॉस्पीटलचे डॉक्टर कार्डीओलॉजीस्ट यांना व्हॉटस्अप्सद्वारे पाठवुन यांचेकडुन माहिती घेवुन इलेक्झीन ३० हे इंजेक्शन देण्यास सांगितले असता,त्यांनी तीन तास विलंबाने सदरचे इंजेक्शन दिलेले आहे. त्यानंतर सदर हॉस्पीटलमधुन आलेल्या एक डॉक्टर महिला यांनी त्या ह्रदयरोग तज्ञ नसताना,त्यांनी पेशंटला ॲम्ब्युलन्सने घेवुन जावुन,काही अंतर गेल्यानंतर पेशंटला कोणतेही उपचार न देता पुन्हा मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल येथे |

घेवुन आल्या. दरम्यानच्या काळात पेशंटची परस्थीती गंभीर होत गेल्याने पेशंट यांचा डॉक्टरांनी वेळेवर इंजेक्शन दिले नसल्याने व औषधोपचारामध्ये अक्षम्य हलगर्जीपणा करणारे डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे पेशंटचा मृत्यु झाला आहे. तसेच सदर हॉस्पीटलचे बांधकाम बेकायदेशिर असुन सदर इसमांनी संगनमताने बनावट दस्ताऐवज तयार करून,दुय्यम निबंधक कार्यालयाकडे नोंदणीच्या प्रोसीडींगसाठी दाखल करुन नोंदणी केली असुन,पीएम आरडी यांची परवानगी न घेता,नॅशनल बिल्डींग कोडच्या तरतुदी प्रमाणे बांधकाम न करता, महाराष्ट्र नर्सिंग होम तरतुदीचे पालन न करता,सदरचे हॉस्पीटल मध्ये काम करणा-या तज्ञ डॉक्टर व नर्सेस यांचेबाबत महा.मेडिकल कौंशील व महा.कौशील ऑफ इंडियन मेडिसीन यांचेकडे रजिस्ट्रेशन न करता नोकरीवर ठेवले आहे. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परीषद,पुणे येथील एक डॉक्टर यांनी संगनमताने हॉस्पीटल उभारणीस बेकायदेशी परवाना दिला आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. चेतन थोरबोले ८३०८४४४१००

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**